**नि. दि. दा. क्र. १३/२०२२**
(निलाबाई विरुध्द लक्ष्मण )

## निशाणी क्र. ०५ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ नुसार दाखल केलेला आहे. निशाणी क्र.६ कडे अर्जाच्या समर्थनार्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. वादीच्या कथनानुसार प्रस्तूत अर्जातील

परिच्छेद १ अ मधील मिळकत – बोहाळी तालुका पंढरपूर, येथील जमीन गट नंबर ५६५/१/क, क्षेत्र ०० हे ८१ आर, आकार ०० रुपये ९० पैसे, चतुःसिमा पुर्वेस बोहाळी मुख्य कोर्टी रस्ता, पश्चिमेस गट नंर ५६५/१/.. वादीची जमीन, उत्तरेस बोहाळी कोर्टी शिव, दक्षिणेस भागवत जाधव, पिंटू जाधव यांची जमिन (वादी क्र.१ व २ यांच्या मालकी वहिवाटीची असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत होते व आहे)

परिच्छेद १ ब मधील मिळकत – गट नंबर ५६५/१/अ क्षेत्र ०२ हे ३५ आर, आकार ०२ पैसे ६६ आर, चतुःसिमा पुर्वेस गट नंबर ५६५/१ब व ५६५/क, पश्चिमेस प्रतिवादीची जमीन, उत्तरेस बोहाळी कोर्टी शिव, दक्षिणेस सत्यवान जाधव, पिंटू जाधव यांची जमीन (वादी क्र.१ ते ४ यांच्या मालकी वहिवाटीची असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत होते व आहे)

परिच्छेद १ क मधील मिळकत – गट नंबर ५६५/१/ब, क्षेत्र ०१ हे. ४१ आर, आकार ०१ रुपये ६५ पैसे, चतुःसिमा पुर्वेस गट नंबर ५६५/१/क पैकी, पश्चिमेस गट नंबर ५६५/१/अ, उत्तरेस बोहाळी कोटी शिव, दक्षिणेस पिंटू जाधव यांची जमीन (वादी क्र.३ यांच्या मालकी वहिवाटीची होत व आहे)

– यांस या पुढे <u>*दावा मिळकती*</u> म्हणून संबोधण्यात येत आहे.

३. वादीच्या कथनानुसार दावा मिळकती हया वादींच्या मालकी व वहिवाटीच्या असून गेली ३० ते ४० वर्षापासून ऊस, डाळींब, मका, तूर, अशी पीके घेवून जमीन वहिवाटून उत्पन्न घेत होते व आहेत. वादी क्र.१ व २ यांची दावा कलम १अ व १ब या मिळकतीमध्ये राहती घरे असून सदर जमिनी लगतच वादी नं ३ व ४ यांची शेतजमिन असून त्यामध्ये वादी नंबर ३ व ४ हे सुध्दा त्यांच्या क्षेत्रामध्ये मशागत करुन वहिवाटुन उत्पन्न घेत होते व आहेत. दावा मिळकती हया दक्षिण उत्तर चालीचा असून जमीनींच्या मदोमद ६०० फुट लांबीचा गट नंबर ५६५/१/अ च्या बांधापर्यंत रस्ता हा वादी नं.१ ते ४ यांच्या मालकी वहिवाटीचा होता व आहे व सदरचा रस्ता पुर्व पश्चिम चालीचा गट नंबर ५६५/१/अ पश्चिमे पर्यंत दावा मिळकतीमध्ये वस्तीमध्ये व शेतीच्या कामासाठी ये–जा करणेसाठी शेवटच्या टोकापर्यंत ठेवला होता व आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी गोड बोलून सदरचा रस्ता गट नंबर ५६५/२ व ५६४/१ ते ४ या मिळकतीमध्ये जाण्या–येण्यासाठी म्हणून दोन्हींच्या मधील असणारा बांध काढून बेकायदेशीररित्या जाण्यास सुरुवात केली. वादींनी प्रतिवादी यांना सदर पुर्व पश्चिम असलेला वादीच्या मालकीच्या जमिनीतला रस्ता हा फक्त वादींचा आहे, याची वारंवार जाणीव करुन दिली. परंतू प्रतिवादी नं.१ ते ३ हे वादीचे मिळकतीमधील बांध फोडून बेकायदेशीररित्या स्वतःच्या वस्तीपर्यंत रस्ता नव्याने तयार करण्याचा प्रयत्न करुन वादीचे जमिनीच्या मधून घुसखोरी करुन मनुष्य बळाच्या जोरावर जाण्याचा व रस्ता काढणेचा प्रयत्न करु लागेले आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे मनुष्यबळ व राजकीय पाठबळाचा वापर करुन दावा मिळकतीमधील वादीच्या मालकीच्या रस्त्यामधुन पुढे जाण्यासाठी म्हणून वादीच्या शांततापुर्ण कब्जे वहिवाटीच्या जमीनीत घुसखोरी करुन नव्याने रस्ता करण्याचा प्रयत्न करत आहे. वादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतू प्रतिवादी हे ऐकण्याच्या मनिस्थितीत नव्हते व नाही.

४. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी यांना त्यांच्या जमीनीत जाण्यासाठी कोर्टी ते बोहाळी शिवचा रस्ता आहे तशी नोंद गट नं. ५६४/२ चे खरेदीखत दिनांक २८.०५.२००३ मध्ये आहे. प्रतिवादी हे त्यांच्या सोईप्रमाणे व मर्जिप्रमाणे

वादीच्या जमिनीमधून जाण्याचा व पिकातून मोठ्या गाड्या घालतात, त्यामुळे वादी नं.१ ते ४ यांच्या पिकाचे नुकसान होत आहे. म्हणून वादीस दावा दाखल करणे भाग पडले आहे.

५. वादी यांनी दावा कलम १अ, १ब, व १ क मधील वर्णन केलेली मिळकतीमध्ये वादीचे शांततापुर्ण कब्जे वहिवाटीस स्वतःच्या मालकीच्या असणा–या रसत्यास हरकत अडथळा व्यत्येय येईल असे कोणतेही कृत्य प्रतिवादी यांनी स्वतः अगर इतर नोकर चाकर कुलमुखत्यारधारक अथवा नातेवाईक यांनी करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यासाठी, तसेच दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत हस्तांतरण करु नये, असे आदेश मिळण्याकरीता विनंती केली आहे व दाव्याच्या निकालापावेतो तात्पूरती मनाई मागीतली.

६. प्रतिवादी क्र.१ यांनी दाव्यास म्हणणे व कैफियत निशाणी क्र.६० वर तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी निशाणी क्र.६३ वर दाखल करुन वादींचा प्रस्तूतचा दावा खरा व कायदेशीर नाही, तो या प्रतिवादींना मुळीच मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. तसेच प्रतिवादीनी दावा कलम १ मध्ये दिलेले मिळकतीचे वर्णन अपुर्ण व चुकीचे आहे, चतुःसिमा चुकीच्या आहेत, त्यामुळे वादीचा दावा व अर्ज कायदयाचे चालणार नाही, म्हणून अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

७. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादी नं.१ यांनी प्रस्तूत दाव्यात नमुद केलेल्या रस्त्याबाबत तहसिलदार पंढरपूर यांचे कोर्टात मामलेदार कोर्ट अॅक्ट कलम ५ प्रमाणे दिनांक १२.०६.२०२० रोजी दावा दाखल केला असून सदर दाव्याचे चौकशीचे कामकाज पुर्ण होवून केस निकालासाठी ठेवल्यानंतर यातील वादी यांनी सदरचे केसचे कामकाज लांबविणेसाठी सोलापूर, जिल्हाधिकारी यांचेकडे केस ट्रान्स्फर करणेबाबत अर्ज दिल्यामुळे सदर केसचे कामकाज मंगळवेढा येथील तहसिलदार यांचे कोर्टात वर्ग करण्यात आला व सध्या तो निकालासाठी ठेवण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी मामलेदार कोर्ट अॅक्क्ट कलम ५ प्रमाणे केलेला दावा या प्रस्तूत दाव्याच्या अगोदर दाखल केलेला असल्यामूळे

प्रस्तूत दाव्यास कलम १० दिवाणी प्रक्रिया संहिता ची बाधा येत आहे.

८. मौजे बोहाळी येथे गट नंबर ५६५/२ पैकी दक्षिणेकडची ० हे २१ आर गट नंबर ५६४/३ पैकी दक्षिणेकडची ० हे ६० आर आणि गट नंबर ५६४/४ पैकी दक्षिणेकडील ० हे ६० आर या प्रतिवादी क्र.१ यांच्या मालकीच्या आहेत. गट क्र.५६४/१/अ च्या जमिनीच्या पूर्व बाजूस वादी नं.१ व २ याची दावाकलम १ब मध्ये नमुद केलेली जमिन असून त्याचे पूर्व बाजूस वादी क.४ यांची दावा कलम १ अ मध्ये नमुद केलेली जमिन आहे. तसेच वादी नं.४ यांचे जमिनीच्या पूर्व बाजूस कोर्टी – बोहाळी दक्षिण उत्तर चालीचा सरकारी रस्ता आहे. वादींच्या जमिनीमधून पुर्व पश्चिम चालीचा १२ फूट रुंदीचा रस्ता असून सदरचा रस्ता प्रतिवादी नं. १ यांचे गट नंबर ५६५/२ मधून त्यांचे इतर जमिनीतून जातो. सदरचा रस्ता हा प्रतिवादी नं. १ यांचे जमिनीपासून ते कोर्टी बोहाळी सरकारी रस्त्यास येवून मिळतो. सदर रसत्याचा वापर प्रतिवादी नं.१ व इतर कोर्टी बोहाळी या सरकारी रस्त्यास जाणे येण्यासाठी, गडी माणसे, जनावरे ट्रक ट्रॅक्टर मालमसोळा ने आण करणेसाठी करीत होते व आहेत. त्यामुळे वादी म्हणतो त्याप्रमाणे प्रस्तूतचा रस्ता हा एकटयाच्या मालकीचा नव्हता व नाही. त्यामुळे वादीस दावा कलम ६ब मध्ये अशा प्रकारची कोणतीही मागणी करणेचा हक्क नव्हता व नाही. त्यामुळे वादीचा दावा हा मुदतीत नाही. त्यामुळे वादीचा तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा

९. वादीच्या जमिनीमधून असणा–या रस्त्याशिवाय प्रतिवादीस त्यांचे जमिनीत जाणे येणेसाठी दुसरा रस्ता नाही. यातील वादी हे गावातील राजकीय पुढा–यांच्या सांगणेवरुन व प्रतिवादीचे वाईटावरील लोकांचे सांगणेवरुन प्रतिवादीस रस्त्याचा वापर करणेस हरकत अडथळा करीत आहेत. वादीने प्रतिवादीचा रस्ता बंद केल्यास प्रतिवादीस त्यांचे जमिनतीत येणेजाणे आवघड होणार असून प्रतिवादीची दारकोंडी होणार आहे व प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

१०. सदर दाव्यातील वादी हे एकमेकांचे जवळचे नातेवाईक असून ते एकविचाराने व संगनमताने वागून प्रतिवादी नं.१ ची दारकोंड करण्यासाठी व प्रतिवादी नं.१ ची जमीन वहिवाटण्यासाठी अडथळा व्हावा व प्रतिवादीस त्याचे जाणे

येण्यासाठी अडचण व्हावी या दृष्ट हेतून रस्त्याचा वापर करण्यास हरकत अडथळा करु लागले. वादीचे कथन पाहता वादीचे जमिनीमधून असणा–या रस्त्याचा वापर प्रतिवादी त्यांचे मिळकतीत जाणे येण्यासाठी करतात हे वादीने दाव्यात मान्य व कबूल केलेले आहे. सदर रस्त्या शिवाय वादीचे इतर क्षेत्रामध्ये प्रतिवादीचा कसलाही संबंध नसून रस्त्याशिवाय राहिलेल्या क्षेत्राबाबत कोणतीही तक्रार कधीही केलेली नाही. अगर वहीवाटीस हरकत अडथळा केलेला नाही असे असतांना वादीने प्रतिवादीचा रस्ता बंद करणेच्या उद्देशाने खोटी व काल्पनिक रचना करुन दावा दाखल केलेला आहे. उलट वादी हे रस्त्यावर पाणी सोडून व अडथळा करुन प्रतिवादीस रस्त्याचा वापर करणेस अडथळा करीत आहेत. प्रतिवादीने सदर रस्त्याच्या वापरास हरकत केली अशी वादीची केस नसल्यामूळे वादीचा निशाणी ५ चा अर्ज कायदयाने चालणार नाही. वादीने गट नंबर ५६५/१/ब या ७/१२ उता–यावरील नमूद सह हिस्सेदारांना पक्षकार केलेले नाही. त्यामूळे दाव्यास आवश्यक पक्षकारांची बाधा येत. वादीचा दावा हा मुदतीत नाही. वादीने दाव्यासोबत दिलेला कच्चा नकाशा हा वस्तूस्थिती नुसार नसून वादीने जाणीवपुर्वक प्रतिवादीचे जमिनीचा उल्लेख केलेला नाही. सदरचा नाकाशा हा अपूर्ण आहे, तो प्रतिवादीस मान्य व कबूल नाही.

११. वादीने दाखल केलेला अर्ज कायदेशीर नाही तो रद्द करण्यात यावा वादीस सकृत दर्शनी केस नाही, न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजुने आहे. वादीचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट वादीचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करुन वादीचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

१२. वादीतर्फे वकील श्री भादुले, प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री घोगरदरे व प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे वकील श्री सरवळे यांचा युक्तीवाद ऐकला.

१३. अर्ज, दावा वादी व प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरुन खालील मुद्दे काढण्यात आले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादी सकृतदर्शनी केस त्यांच्या हक्कात असल्याचे सिध्द करतात काय ? | नाही. |
| ०२. | वादी तुलनात्मक दृष्टया न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द करतात काय ? | नाही. |
| ०३. | प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल ही बाब सिध्द करतात काय ? | नाही. |
| ०४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## – कारणमीमांसा –

१४. मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडील **शामराव गणपत चिंतामणी वि. काकासाहेब लक्ष्मण गोरडे २००८(२) एम.एच.एल.जे.८१९** च्या न्यायनिर्णयानुसार या अर्जाच्या सुनावणीसाठी दोन्ही पक्षांनी दाखल केलेली कागदपत्रांचे औपचारीक पुराव्याखरेजी अवलोकन करता येईल.

१५. वादी यांनी खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

निशाणी ४ सोबत

१. मौज बोहाळी येथील शेत जमिन गट नंतर ५६५/१/अ चा चालू ७/१२ उतारा,

२. मौजे बोहाळी येथील शेतजमिन गट नंबर ५६५/१/ब चा चालू ७/१२ ` उतारा,

३. मौजे बोहाळी येथील शेतजमीन गट नंबर ५६५/१/क चा ७/१२ उतारा,

४. मौजे बोहाळी ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील संपुर्ण गावाचा नकाशा,

५. मौजे बोहाळी येथील गट नं.५६४/२ चे खरेदीखत दिनांक २८ मे २००३ झेरॉक्स प्रत,

निशाणी २७ सोबत

१. मौजे बोहाळी येथील गट नंबर ५६५/२ चा ७/१२ उतारा

२. तहसिलदार पंढरपूर यांचे कडील रस्ता केस नंबर ०६/२०२० ची सत्यप्रत,

३. दावा मिळकतीचे रस्त्याचे एकूण १० फोटो,

निशाणी ७६ सोबत

कोर्टी बोहाळी शिवेच्या रस्त्याचे दिनांक ३०.०७.२०२३ रोजीच्या दोन छायाचित्रांची अस्सल प्रत,

निशाणी ७७ सोबत

१. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६५/१/अ या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

२. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६५/१/ब या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

३. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६५/१/क या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

४. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६५/२ या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

५. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६४/१४ या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

६. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६४/२ या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

७. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६४/३ या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

८. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६४/४ या ७/१२ उता–याची डिजीटल प्रत,

निशाणी ८१ सोबत

वाद मिळकतीचा गावनकाशा

१६. प्रतिवादीतर्फे खालील प्रमाणे कागदपत्रे दाखल करण्यात आली आहे.

निशाणी क्र. ८४ सोबत

१. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील गट नं.५६५/२ या ७/१२ उता-याची डिजीटल प्रत,

२. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील फेरफार नोंद १२६३ या ६ ड च्या उता-याची सही शिक्याची नक्कल.

३. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील फेरफार नोंद २२८६ या ६ ड च्या उता-याची सही शिक्याची नक्कल.

४. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील फेरफार नोंद २२६९ या ६ ड च्या उता-याची सही शिक्याची नक्कल.

५. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील फेरफार नोंद २२०३ या ६ ड च्या उता-याची सही शिक्याची नक्कल.

६. मौजे बोहाळी ता. पंढरपूर येथील फेरफार नोंद २४२४ या ६ ड च्या उता-याची सही शिक्याची नक्कल.

**मुद्दे क्र. १ ते ३ बाबत.**

१७. वादींच्या कथनानुसार दावा मिळकती मधील वादातील रस्ता हा वादींच्या स्वमालकीचा आहे. त्यावरुन प्रतिवादी यांना येण्या जाण्याचा कोणताही हक्क नाही. याउलट वादींनी निशाणी ४/५ कडे दाखल केलेल्या १९७९/२००३ च्या खरेदीखतानुसार प्रतिवादी क्र.१ यांनी गट नंबर ५६४/२०२२ मधील उत्तर बाजूने दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणा-या रस्त्यावर हक्क आहे व त्याप्रमाणे त्यांना रस्ता उपलब्ध आहे, असे कथन केले. वादीतर्फे वकील श्री भादूले यांनी युक्तीवाद करतांना वाद रस्त्यास प्रतिवादीचा काही ही संबंध नाही. प्रतिवादी मनुष्य बाळाच्या व पैशाच्या जोरावर, राजकीय लोकांच्या मदतीने नसलेला हक्क प्रस्थापीत करत आहे व नव्याने रस्ता तयार करत आहे. वादीने दाव्या सोबत दावा मिळकत विषयी वस्तुस्थिती स्पष्ट करणारा कच्चा हात नकाशा दाखल केला आहे व त्यामध्ये पूर्वेकडून कोर्टी बोहाळी रस्ता गट नंबर ५६५/१/क मधून गट नंबर ५६५/१/अ

च्या पश्चिमेकडून उत्तरकडे जाणारा इतर रस्ता असितत्वात असल्याचे दाखविले आहे.

१८. या नकाशाचे अवलोकन केले असता एका महत्वाच्या बाबीचा या ठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे, ती म्हणजे वादीने नकाशामध्ये प्रतिवादी क्र.१ यांच्या गट क्रमांक ५६५/२ याचे क्षेत्र कुठे आहे हे दाखविले नाही. याउपर, गट नंबर ५६५/२/अ व गट नंबर ५६५/२ मधील धारक संजय शिंदे यांच्या जमीनी कुठे आहेत हेही नकाशा मध्ये दर्शविले नाही.

१९. प्रतिवादीने दिलेल्या म्हणणे मध्ये वाद रस्त्याबाबत तहसिलदार, पंढरपूर यांच्याकडे प्रतिवादी क्र.१ यांनी मामलतदार कोर्ट अॅक्ट कलम ५ प्रमाणे रस्ता केस नंबर १६/२०२० चा दाखल केला आहे व त्या केसमध्ये वाद विषयातील रस्त्यावर वादीने प्रतिवादींना ये–जा करण्यास हरकत अडथळा करु नये अशी मागणी केल्याचे कथन आहे.

२०. वादीचा दावा व निशाणी ५ कडील अर्जाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता वादीने तहसिलदार पंढरपूर यांच्याकडे प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेल्या रस्ता केस नंबर १६/२०२० बाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. यावरुन वादीने दावा व निशाणी क्र.५ कडील अर्जात रस्ता केस बाबतचा मजकूर व दाव्यासोबतच्या नकाशामध्ये गट ५६५/२ ची नेमकी वस्तुस्थिती न नमूद केल्याने या बाबी जाणून बुजून लपवून ठेवल्याचे स्पष्ट होते. मात्र रस्त्याचे अस्तित्व वादीने मान्य केले आहे व तो दाव्यासोबतच्या नकाशात दाखवली आहे.

२१. प्रतिवादीच्या कथनानुसार सदरचा रस्ता गेल्या ४० वर्षापासून अस्तित्वात आहे. मात्र वादीने दाव्यामध्ये व निशाणी ५ कडील अर्जात रस्त्याचे अस्तित्व केव्हा पासून आहे, याचा कोणताही उल्लेख केला नाही. त्यामुळे, यावरुन वादीने रस्त्याचे अस्तित्व नेमके केंव्हा पासून आहे, हे जाणून बुजून लिहिले नसल्याचे व ते मुद्दामहून लपवून ठेवले असल्याचे वादीच्या दाव्यावरुन व निशाणी ५ च्या अर्जावरुन स्पष्ट होते.

२२. वादी दावा कलम २ मध्ये पान क्र.५ वर, ''असे असतांना यातील

प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादी क्र.१ ते ४ यांना गोड बोलून सदरचा रस्ता गट नंबर ५६५/२ व ५६४/१ ते ४ या मिळकतीमध्ये येण्या जाण्यासाठी म्हणून दोन्हीच्या मधील असणार बांध काढून बेकायदेशीररीत्या जाण्यास सुरुवात केली'', असा स्पष्ट उल्लेख केला. मात्र, प्रतिवादींनी वादी यांना गोड बोलून केंव्हा पासून रस्त्यावर येण्या जाण्यास सुरुवात केली हे ही नमूद केलेले नाही. या उलट वादीच्या दाव्याचे कारण पाहता, दिनांक ०७.१२.२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीने रस्त्यावर पाणी का सोडले असे विचारुन दमदाटी व शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व तु आम्हाला कसे आडवा येतो असे म्हणून वादीच्या मालकी वहिवाटीच्या मिळकतीमधून बेकायदेशीर रीत्या स्वतःचे बांध घालून वादीने दमदाटी केली तेंव्हा पासून घडल्याचे नमूद केले आहे.

२३. वादीने दावा मिळकतीमध्ये असणारे रस्त्याचे अस्तिःत्व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची त्यावरील वहिवाट ही स्पष्टपणे नाकारलेली नाही. याउलट, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे काही काळ दावा मिळकतीतील रस्त्यावरुन वादीस विचारुन वहिवाट करत होते, हे दाव्याचे पान क्र.५ वर स्पष्टपणे कबूल केले आहे.

२४. वादीनी गट नंबर ५६५/२ ची वस्तुस्थिती नकाशावर आणली नाही तसेच तहसिलदार, पंढरपूर यांच्याकडे दाखल केलेल्या रस्ता केस नंबर १६/२०२० ची वस्तुस्थिती दाव्यात व निशाणी ५ च्या अर्जामध्ये नमूद केली नाही. मात्र युक्तीवादादरम्यान वादीतर्फे वकील श्री भादूले यांनी प्रतिवादी क्र.३ हा राजकीय पक्षाचा मोठा पदाधिकारी असून पोलिस अधिकारी व शासकीय अधिकारी यांच्यासोबत असलेले दृढ हितसंबंध वापरुन राजकीय दबाव वापरुन रस्त्यात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत असल्याचे नमूद केले. या कथनावरुन वादीनी जाणुन बुजून रस्ता केस नंबर १६/२०२० ची वस्तूस्थिती व नकाशामध्ये गट नंबर ५६५/२ ची वस्तुस्थिती नमूद केली नसल्याचे स्पष्ट होते.

२५. मुळात वादीने रस्ता केस नंबर १६/२०२० चा दावा दाखल केल्यानंतर साधारण दोन वर्षा नंतर प्रस्तूतचा दावा दाखल केले आहे. तहसिलदार, पंढरपूर यांच्याकडील रस्ता केस मधील वाद विषय व या केस मधील वाद विषय हा

एकच असल्याचे स्पष्ट होते. वादीने निशाणी २७ सोबत रस्ता केस नंबर १६/२०२० मधील अर्जाची प्रत व दिनांक ०९.१२.२०२१ रोजी तहसिलदार, पंढरपूर यांनी त्या कामी केलेल्या पंचनाम्याची प्रत व वाद मिळकतीतील रस्त्याचे फोटो दाखल केले. यावरुन, तहसिलदार, पंढरपूर समोरील अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ हे अर्जदार व या दाव्यातील वादी हा समनेवाला असल्याचे स्पष्ट होते. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी तहलिसदार समोर या दाव्यातील वादी यांना रस्त्याच्या वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व रस्ता नष्ट होईल असे कृत्यू करु नये म्हणून या वादीच्या विरोधात मनाई मागीतल्याचे स्पष्ट होते. त्या कामी तहसिलदार, पंढरपूर यांनी केलेल्या पंचनाम्यानुसार वाद मिळकतीतील रस्ता अस्तित्वात असल्याचे नमूद आहे. अशी वस्तुस्थिती असतांना वादींनी दावा मिळकतीबाबतची वस्तुस्थिती नकाशात नमूद न करता तसेच रस्त्याबाबत वाद प्रलंबीत असल्याचे तथ्य दाव्यात व अर्जात नमूद न करता, त्या बाबी न्यायालयापासून लपवून ठेवून दावा व निशाणी ५ कडील अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट होते.

२६. प्रतिवादी यांचे वकील श्री घोगरदरे व श्री सरवळे यांनी त्यांच्या युक्तीवादादरम्यान वादी हे प्रस्तूतचा दावा तहसिलदार, पंढरपूर यांच्याकडील प्रकरण लांबविण्यासाठी व या दाव्याच्या कामी महत्वाच्या बाबी लपवून ठेवून न्यायालयाकडून मनाई घेवून त्याचा वापर रस्ता केस नं १६/२०२० मध्ये बेकायदेशीररीत्या करण्यासाठी दावा दाखल केल्याचे कथन केले. वादीच्या महत्वाच्या बाबी लपविण्यामागे हा उदेश असू शकतो , अशी या घडीला प्रथमदर्शनी शंका निर्माण होते आहे. जर तसे नसेल तर, वादीने २०२० पासून प्रलंबीत असलेल्या व वाद विषयाशी थेट संबंध असलेल्या वादा बाबतचा मजकूर दाव्यात व निशाणी ५ च्या अर्जात का नमूद केला नाही , याचे स्पष्टीकरण वादीतर्फे देण्यात आलेले नाही. नकाशामध्ये गट नंबर ५६५/२ बाबत वस्तूस्थिती का दाखविली नाही, याचे उत्तर देतवेळी वादी तर्फे वकील श्री भादूले यांनी नजरचुकीने तसे नमूद करण्याचे राहून गेले, असा युक्तीवाद केला मात्र त्यानंतरही ना नकाशा दुरुस्त केला, ना निशाणी ५ कडील अर्ज ना दावा. त्यामूळे, वादी मुळात स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आला नसल्याचे स्पष्ट होते. वादीने महत्वाची बाब न्यायालयासमोर

लपवून ठेवली व न्यायालयाकडून ऐच्छीक स्वरुपाची मनाई सारखी दाद मिळविण्याचा प्रयत्न केला, अशा परिस्थिती मध्ये *मा उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडील २००८ (३) एम. एच. एल जे. ५८७ हरचरणजीत सिंग थिंड कॅप्टन विरुध्द दिक्षा थिंड* या केसमधील न्यायानिर्णयानूसार वादी मनाई सारखी ऐच्छीक दाद मिळण्यास अपात्र ठरतो. या न्यानिर्णयामध्ये पॅरा नंबर १७ मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

> “17.... The defendant has clearly stated in her reply that the plaintiff had obtained ex–parte order by making misleading statement and suppressing material documents. The defendant had also stated that the plaintiff had even gone to the respondent for giving her address at Torda, Britona, Bardez, Goa when in fact the plaintiff well knew that the defendant was residing in Bombay and only after the summons were returned unserved at the said Torda address, that they were published in a newspaper, and the defendant came to know about the filing of the suit through the said publication. A relief of injunction is discretionary and equitable. It is well settled principle that the party who suppresses from the Court, material facts, does not deserve the grant of any discretionary relief, much less a temporary injunction. It is also well settled that a Court will not help a party who has not come with clean hands. In this view of the matter also, the application ought to have rejected. There is no merit in this appeal and, accordingly, the same is hereby dismissed.”

२७. याच बरोबर प्रतिवादीतर्फे वकील श्री घोगरदरे यांनी या ए.आय.आर.१९९९ बॉम्बे ३६२ या न्यायनिर्णयाचा आधार घेवून महत्वाच्या बाबी न्यायालयासमोर लपविले असल्याने मनाईची दाद नामंजूर करणे आवश्यक आहे असा युक्तीवाद केला.

२८. त्यामुळे या सर्व बाबींवरुन व कागदोपत्री पुराव्यावरुनही वादी काही महत्वाच्या बाबी न्यायालयापासून लपवत असल्याचे स्पष्ट दिसून येते. यावरुन वादी हा न्यायालयासमोर स्वच्छ हाताने आलेला नाही असे दिसून येते. जेव्हा वादी हा स्वतःच्या लाभात समन्यायिक दाद मागत आहे तेव्हा त्याने त्याच समन्यायिक तत्वाने वागणे कायद्याने अपेक्षित आहे. (one who seeks equity must do equity) या कायदेशीर मुद्याचा विचार करता वादी याच्या कथनांचा त्यांच्या लाभात विचार करण्याचे कारण उरत नाही आणि त्यामुळे वादी मागणी करतो त्याप्रमाणे त्याच्या लाभात तुर्तातुर्त मनाईची दाद देता येणार नाही. त्याच बरोबर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खाली नमुद न्यायनिर्णयानुसारही दाद देता येणार नाही.

(अ) **बाबूराव गणपत माळी विरुध्द बाळासाहेब अण्णा पाटील आणि इतर, २००७ (२) ऑल एमआर ३६४,** ज्यामध्ये नामदार मुंबई उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे कायदेशिर तत्व सांगितले आहेः–

''वादीने महत्वाच्या बाबी न्यायालयापासून लपवून ठेवून जर तो स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेला नसेल तर तो मनाईची दाद त्याच्या लाभामध्ये मिळण्यास पात्र राहणार नाही.

(Civil P.C. (1908), O.39, Rr.1, 2 – Suit for permanent injunction – plaintiff suppressing material facts- plaintiff not coming to court with clean hand – plaintiff not entitled to get the relief of injunction.)”

(ब) **श्री. कच्छी व्हिसा ओसवाल डेरावासी जैन पाठशाला विरुध्द श्री. कच्छी व्हिसा ओसवाल डेरावासी जैन महाराज आणि इतर २००५ (१) ऑल एमआर ४८४,** ज्यामध्ये नामदार मुंबई उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे कायदेशिर तत्व सांगितले आहेः–

''वादीने महत्वाच्या बाबी न्यायालयापासून लपवून ठेवून जर तो स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेला नसेल तर तो मनाईची दाद त्याच्या लाभामध्ये मिळण्यास पात्र राहणार नाही.

(The grant or refusal to grant of injunction is covered by three well established principles viz. (i) whether the petitioner has made out a prima facie case; whether the petitioner would suffer irreparable injury; and (iii) whether the balance of

convenience lies in his favour.

Civil P.C. (1908),O.39, Rr.1, 2 – Suit for permanent injunction – plaintiff suppressing material facts- plaintiff not coming to court with clean hand – plaintiff not entitled to get the relief of injunction.)”

The burden to prove these three necessities lies on the person seeking injunction. Injunction is not granted to a party guilty of delay or who is indulged in suppression of facts. The person seeking injunction must approach the Court with clean hands. The Court has to see whether the claim is bonafide and whether there is a fair and substantial question to be tried. (para 34)

२९. वरील न्यायनिर्णयांचा काळजीपूर्वक विचार केला असता व प्रकरणातील कागदपत्रे व तथ्ये यांचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यानंतर वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आला नसल्याचे व तसेच वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये असलेल्या तहसिलदार यांच्याकडील प्रलंबित रस्त्याच्या केसबाबत तसेच वादीच्या गट नंबर मधील इतर हिस्सेदार तसेच प्रतिवादी क्र.१ चा गट नंबर ५६५/२ ची नकाशात परिस्थिती का लपवली याचे स्पष्टीकरण न दिल्याने मनाई सारखी ऐच्छिक दाद मिळण्यास वादी पात्र नाही. वादीकडे प्रथम दर्शनी केस नसल्याचे, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने नसल्याचे, अर्ज नामंजूर केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे स्पष्ट होते. करिता मी मुद्दे क्र.१ ते ३ ची उत्तरे नाकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

वादीचा निशाणी क्र. ५ कडील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहीर.)

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2023.09.04 10:44:40 +0530

(एम. आर. कामत.)

दिनांकः–३०.०८.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

a) Court : Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur

b) Name of Stenographer : R.M.Gogi.

c) Date 30.08.2023

d) Order signed by
the Presiding Officer on : 02.09.2023.